
0 8 JUN 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनसंपर्क कक्ष

# कोरगावकर व्याख्यानमालेसाठी एक लाखांचा वाढीव निधी सुपूर्द

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'कै. प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमाले'साठी कोरगावकर उद्योग समूहाच्या प्रमुख पल्लवी कोरगावकर यांनी एक लाख रुपयांच्या वाढीव रकमेचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे शुक्रवारी सुपूर्द केला.



शिवाजी विद्यापीठाच्या 'कै. प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमाले'साठी कोरगावकर उद्योग समूहाच्या प्रमुख पल्लवी कोरगावकर यांनी एक लाख रुपयांच्या वाढीव रकमेचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे शुक्रवारी सुपूर्द केला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

विद्यापीठ निधीतून तसेच विविध व्यक्ती, संस्था यांच्या देणगीमधून एकूण ३८ व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात. येथील गोविंदराव कोरगावकर धर्मादाय संस्था यांनी १९८९मध्ये विद्यापीठाला २५ हजार रुपयांची देणगी दिली होती. त्या देणगीमधून 'कै. प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमाला' विद्यापीठात सुरू करण्यात आली. या व्याख्यानमालेंतर्गत ज्येष्ठ विचारवंत य. दि. फडके, प्रा. ग. प्र. प्रधान, प्रा. राम शेवाळकर, मेधा पाटकर, माजी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी आदी मान्यवरांनी व्याख्याने दिली आहेत. काळानुरूप बँकांच्या व्याजदराचे घटलेले दर आणि व्याख्यानमालेवरील वाढता खर्च यांचे व्यस्त प्रमाण लक्षात घेऊन कोरगावकर यांनी व्याख्यानमालेसाठी एक लाख रुपयांच्या वाढीव निधीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी कोरगावकर यांचा ग्रंथभेट देऊन डॉ. शिर्के यांनी गौरव केला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, भरत शास्त्री उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUN 2024

पुण्यनगरी




कोल्हापूर : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे धनादेश सुपूर्द करताना उद्योजिका पल्लवी कोरगावकर. सोबत कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

# कोरगावकर यांच्याकडून विद्यापीठास लाखाचा वाढीव निधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या 'कै. प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमाले'साठी कोरगावकर उद्योग समूहाच्या प्रमुख पल्लवी कोरगावकर यांनी एक लाख रुपयांच्या वाढीव रकमेचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. गोविंदराव कोरगावकर धर्मादाय संस्था यांनी सन १९८९ मध्ये शिवाजी विद्यापीठास २५ हजार रुपयांची देणगी दिली होती. त्या देणगीमधून 'कै. प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमाला' सुरू करण्यात आली. काळानुरूप बँकांच्या व्याज दराचे घटलेले दर आणि व्याख्यानमालेवरील वाढता खर्च यांचे व्यस्त प्रमाण लक्षात घेऊन पल्लवी कोरगावकर यांनी व्याख्यानमाला सुरळीत सुरू राहण्यासाठी वाढीव निधी देण्याचे ठरवले होते. त्यानुसार त्यांनी धनादेश सुपूर्द केला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कोरगावकर यांना ग्रंथभेट देऊन गौरव केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, भारत शास्त्री उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUN 2024
तरुण भारत



कोल्हापूर : उद्योजिका पल्लवी कोरगांवकर यांनी कै.प्रभाकरपंत कोरगांवकर व्याख्यानमालेसाठी एक लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

# कोरगांवकर उद्योग समुहातर्फे विद्यापीठास एक लाखाचा निधी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या कै. प्रभाकरराव कोरगांवकर व्याख्यानमालेसाठी कोरगांवकर उद्योग समुहातर्फे एक लाख रुपयाचा निधी देण्यात आला. उद्योजिका पल्लवी कोरगांवकर यांनी शुक्रवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे एक लाख रुपयाचा धनादेश सुपूर्द केला.

गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्थेच्या देणगीमधून 'कै. प्रभाकरपंत कोरगांवकर स्मृती व्याख्यानमाला सुरू करण्यात आली. याअंतर्गत ज्येष्ठ विचारवंत व मान्यवरांची व्याख्याने झाली. काळानुरुप बँकांच्या व्याजदराचे घटलेले दर आणि व्याख्यानमालेवरील वाढता खर्च यांचे प्रमाण लक्षात घेऊन कोरगांवकर यांनी वाढीव निधी देण्याचे ठरविले होते. त्यानुसार त्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे एक लाख रुपयांच्या वाढीव निधीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, भारत शास्त्री उपस्थित होते..

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUN 2024
सकाळ

# पल्लवी कोरगावकर यांच्यातर्फे विद्यापीठास लाखाचा धनादेश

## प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमालेस रक्कम

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या कै. प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमालेसाठी कोरगावकर उद्योग समूहाच्या प्रमुख पल्लवी कोरगावकर यांनी एक लाख रुपयांच्या वाढीव रकमेचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

येथील गोविंदराव कोरगावकर धर्मादाय संस्थेने १९८९ मध्ये शिवाजी विद्यापीठास २५ हजार रुपयांची देणगी दिली होती. त्या देणगीमधून 'कै. प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमाला' विद्यापीठात सुरू झाली. या व्याख्यानमालेंतर्गत ज्येष्ठ विचारवंत य. दि. फडके, प्रा. ग. प्र. प्रधान, प्रा. राम शेवाळकर, मेधा पाटकर, माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, ज्येष्ठ पत्रकार जगन फडणीस, माधव गडकरी, अशोक जैन, प्रा. एन. डी. पाटील, अविनाश धर्माधिकारी, शाम मानव, बाळासाहेब भारदे, मधू दंडवते, डॉ. नरेंद्र दाभोळकर, प्रकाश बाळ, अण्णा हजारे, डॉ. अरुण निगवेकर, डॉ. अनिल अवचट यांची व्याख्याने झाली. काळानुरूप बँकांच्या व्याजदराचे घटलेले दर आणि व्याख्यानमालेवरील वाढता खर्च यांचे व्यस्त प्रमाण लक्षात घेऊन कोरगावकर यांनी व्याख्यानमाला सुरळीत सुरू राहण्यासाठी वाढीव निधी देण्याचे ठरविले होते.

त्यानुसार त्यांनी नुकतीच कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे एक लाख रुपयांच्या वाढीव निधीचा धनादेश सुपूर्द केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUN 2024
सकाळ



कंदलगाव : कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्याकडून 'एम्पावर्ड ॲटॉनॉमी'चे पत्र स्वीकारताना केआयटीचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी, शेजारी अन्य मान्यवर.

# 'एम्पॉवर्ड ॲटॉनॉमी'चा 'केआयटी'ला दर्जा

कंदलगाव, ता. ७ : केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या शिफारशीवरून व्यवस्थापन परिषदेने 'एम्पावर्ड ॲटॉनॉमी' महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला. यानुसार 'केआयटी'ला शिवाजी विद्यापीठ व महाविद्यालयाची जॉईंट डिग्री पदवी प्रदान करता येईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तत्त्वानुसार केआयटी महाविद्यालय भविष्यात स्वतःची पदवी बहाल करण्यासाठी मार्गक्रमण करणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे तसेच अन्य व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या उपस्थितीत पत्र देऊन 'केआयटी'ला सन्मानित केले. यावेळी संस्थाध्यक्ष सुनील कुलकर्णी, सचिन मेनन, भरत पाटील व डॉ. मनोज मुजूमदार उपस्थित होते.

> 'एम्पॉवर्ड ॲटॉनॉमी'मुळे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे सोपे होईल. अशा दर्जामुळे भविष्यात 'केआयटी'च्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तत्त्वानुसार अन्य राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जेदार संस्थांमध्येही सहजगत्या प्रवेश मिळून क्रेडिट ट्रान्सफरची सुविधा मिळू शकते.
>
> **- डॉ. मोहन वनरोट्टी**, संचालक

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUN 2024
लोकमत

# बी.ए. फिल्म मेकिंग कोर्सचे डॉ. शिवाजी जाधव समन्वयक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे बी.ए. फिल्म मेकिंग या अभ्यासक्रमाचे समन्वयकपद देण्यात आले. कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी नुकतेच हे निर्देश दिले असून, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी डॉ. जाधव यांना समन्वयक पदाचे पत्र सुपुर्द केले. शिवाजी विद्यापीठात प्रथमच चित्रपटाशी संबंधित बारावीनंतर तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. जाधव यांची समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUN 2024

पुण्यनगरी

# डॉ. शिवाजी जाधव 'फिल्म मेकिंग कोर्स'चे समन्वयक



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे बी. ए. फिल्म मेकिंग या अभ्यासक्रमाचे समन्वयक पद दिले आहे. कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी नुकतेच हे निर्देश दिले. या नियुक्तीसाठी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे सहकार्य लाभले. शिवाजी विद्यापीठात प्रथमच चित्रपटाशी संबंधित बारावीनंतर तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू झाला आहे. याची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. जाधव यांची नियुक्ती केली आहे. डॉ. जाधव यांना पत्रकारितेचा १६ वर्षांचा अनुभव आहे. पत्रकारितेशी संबंधित त्यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. सध्या ते एम. ए. मास कम्युनिकेशन कोर्स आणि पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचेही समन्वयक आहेत. शिवाजी विद्यापीठात सुरू होत असलेल्या कम्युनिटी रेडिओचेही ते नोडल ऑफिसर आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUN 2024
तरुण भारत

# फिल्म मेकिंग कोर्सच्या समन्वयकपदी डॉ. शिवाजी जाधव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे बी. ए. फिल्म मेकिंग या अभ्यासक्रमाचे समन्वयकपद देण्यात आले आहे. कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी नुकतेच हे निर्देश दिले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी डॉ. जाधव यांना नुकतेच समन्वयक पदाचे पत्र सुपूर्द केले. या नियुक्तिसाठी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे सहकार्य झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUN 2024

पुढारी

# उन्हाळी सत्रातील ६४६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रातील ६४६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी मास्टर ऑफ आर्किटेक्चर, डीबीएम, एमएड्., आदी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

आजअखेर ६४६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आज निकालाची सरासरी ९.५० इतकी आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUN 2024
पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित 'मिलेट द नेचर्स क्रॉप' पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अभिजित अरुण गताडे, डॉ. प्रवीणकुमार पाटील.

# भरड धान्यांचा उपयोग दैनंदिन आहारामध्ये होणे आवश्यक

## कुलगुरू डॉ. शिर्के; 'मिलेट द नेचर्स क्रॉप' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भरड धान्यांचा उपयोग दैनंदिन आहारामध्ये होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये आयोजित ऑनलाईन बैठकीमध्ये 'मिलेट द नेचर्स क्रॉप' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. पुस्तकासाठी बहिस्थ परीक्षक म्हणून परीक्षण केलेले 'इंडिया मिलेट इनिशिएटिव्ह'चे चेअरमन डॉ. सत्येन यादव ऑनलाईन उपस्थित होते. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. अभिजित अरुण गताडे, डॉ. प्रवीणकुमार पाटील, हर्षवर्धन कांबळे यांनी पुस्तकाचे संकलन केले आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते हे पुस्तक ई-बुक फॉर्ममध्ये विद्यापीठाच्या वेबसाईटवर सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आले. इंग्रजी भाषेमध्ये असलेले पुस्तक मराठी भाषेमध्ये उपलब्ध करून देण्याबाबत डॉ. शिर्के यांनी संबंधितांना सूचना केली. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भरड धान्य पिकांची वैशिष्ट्ये म्हणजे ही अल्प पावसाच्या परिस्थितीत शुष्क व अर्ध-शुष्क भागात वाढतात. पिकांमध्ये उच्च पौष्टिक मूल्ये असून, ती पौष्टिक तृणधान्य म्हणून ओळखली जातात. यापासून विविध आरोग्यवर्धक पदार्थ तयार करता येतात. कोल्हापूर हॉटेल संघटनांनीही भरड धान्याचा समावेश मेनू कार्डमध्ये करण्याचा मानस व्यक्त केला.

डॉ. अभिजित गताडे यांनी प्रास्ताविक केले. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, हर्षवर्धन कांबळे उपस्थित होते.